# <u>रे.दि.मु.क्र.३१९/२०१३ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>
# <u>(जाहीर केल्याची तारीख १३/१०/२०१७)</u>

०१. अर्ज निशाणी ५ वाचला. प्रतिज्ञापत्र निशाणी ६ चे अवलोकन केले. वादपत्र निशाणी १ व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीतर्फे म्हणणे निशाणी ३० वाचले.

०२. वादींतर्फे विधीज्ञ सौ.एस.व्ही.थोरात आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.सी.शेजवळ यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सदरचा अर्ज निकाली करण्यासाठी विचाराधीन उपस्थित झालेले वादप्रश्न आणि त्यावरील माझे सकारण निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१. वादी यांनी तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | ... नाही |
| ०२. न्यायाचा समतोल वादींचे बाजुने आहे काय ? | ... नाही |
| ०३. तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... नाही |
| ०४. आदेश कोणता ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ३</u>–

०४. मुद्दे क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने विवेचनाची

पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत.

०५. वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादींच्या वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाच्या मालकीहक्काची व वहिवाटीची आहे. वादींचे वडील कै.तुळशिराम महादू निकाळजे यांचे बंधू दादू महादू निकाळजे यांनी १९७७ साली खातेफेड केल्यामुळे दावा मिळकत त्यांच्या नावे आलेली होती. दादु व तुळशिराम यांच्यामध्ये सदर मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झाले नव्हते अगर नाही. सदर मिळकतीमध्ये वादींचे वडील व चुलते हे दोघेही वहिवाट करीत होते. वादींच्या वडीलांनी प्रतिवादीस दि. १५/०५/२००४ रोजी र.रु. ३०,०००/– ला दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन दिले आहे. वादींचे वडीलांची वयोमानाने, प्रकृती अस्वास्थ्यामुळे मानसिक व शारिरीक आकलन क्षमता कमी झाली होती. त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादीने खरेदीपत्र केलेले आहे. वादींच्या वडीलांना प्रतिवादीने खरेदीपत्राची मोबदला रक्कम दिलेली नाही. सदरचा खरेदीदस्त वादींच्या वडीलांनी कोणतीही कायदेशीर गरज नसताना केलेला आहे. त्यामुळे सदर खरेदीपत्र बेकायदेशीर असून दावा मिळकतीमध्ये वादींचा हक्क व हिस्सा आहे. सबब वादींनी प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश होवून मिळणेची विनंती केली आहे.

०६. प्रतिवादींनी निशाणी ३० कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वादींच्या वडीलांनी त्यांच्या ए.कु.मॅ. या नात्याने कायदेशीर गरजे करीता दि. १५/०५/२००४ रोजी दावा मिळकत प्रतिवादीस विक्री केली आहे. त्यावेळी त्यांची मानसिक व शारिरीक स्थिती चांगली होती. दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादींना खरेदीपत्रावेळीच देण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकतीचे बोनाफाईड खरेदीदार आहेत. सबब, वादींचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०७. निशाणी ३/१ लगत दाखल दि.१५/०५/२००४ रोजीचे

खरेदीपत्राची साक्षांकित प्रत वाचून पाहिली असता वादींचे वडील तुळशिराम महादू निकाळजे यांनी मौजे भोसलेवाडी येथील गट क्र. २०४ ची मिळकत र.रु. ३०,०००/- ला प्रतिवादीस खरेदी दिल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वाचून पाहिता असता वादींनी मौजे कोर्टी येथील ग.नं. २०४ ची मिळकत वादीचे वडील तुळशिराम यांनी प्रतिवादीस विक्री केल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादींनी दावा मिळकतीचे योग्य, निश्चित व नेमके वर्णन केले नाही असे दिसून येते.

०८. प्रतिवादीचे मुळ कथन असे आहे की, वादींचे वडीलांनी त्यांचे एकत्र कुटुंबाचे कायदेशीर गरजे करीता दावा मिळकतीचे खरेदीपत्र प्रतिवादीस करुन दिलेले आहे. त्या अनुषंगाने निशाणी ३/१ कडील दि.१५/०५/२००४ रोजीचे खरेदीपत्राचे अवलोकन केले असता त्यामधील भरण्याचा तपशिल या रकान्यात वादींच्या वडीलांनी प्रतिवादीकडून र.रु. ३०,०००/- लोकांचे देणे वारणेसाठी व घर खर्चासाठी स्वीकारल्याचे नमुद आहे. यावरुन प्रथमदर्शनी वादींचे वडील तुळशिराम यांनी दावा मिळकत ही त्यांचे एकत्र कुटुंबाचे कायदेशीर गरजेकरीता विक्री केली आहे असे दिसून येते.

०९. दि.१५/०५/२००४ रोजीच्या खरेदीपत्रान्वये दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडे असल्याची बाब वादातीत नाही. सदरचे खरेदीपत्र प्रथमदर्शनी वादींचे वडील तुळशिराम यांनी कौटुंबिक गरजेकरीता केल्याचे स्पष्ट झाल्याने प्रतिवादी हे दावा मिळकतीचे बोनाफाईड खरेदीदार आहेत हे देखील प्रथमदर्शनी स्पष्ट आहे.

१०. वादींनी दावा मिळकत ही त्यांची वाडवडीलार्जित एकत्र कुटुंबाची मालकीहक्काची मिळकत असल्याचे कथन केले आहे. वादींनी निशाणी १६ लगत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. मात्र त्यावरुन दावा मिळकत वादींची वडिलार्जित मिळकत आहे याचा बोध होत नाही. अभिलेखावरील दाखल

कागदपत्रांवरुन दावा मिळकत वादींचे वडील तुळशिराम यांच्या नावे कशी आली याचा बोध होत नाही. दावा मिळकत ही वादींचे वाड वडिलार्जित एकत्र कुटुंबाची मिळकत आहे असे प्रथमदर्शनी दाखविणारा कागदोपत्री पुरावा वादींनी प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. केवळ वादींनी दावा मिळकत त्यांची वडिलोपार्जित आहे असे कथन केल्याने ती मिळकत वादींची वाड वडिलोपार्जित आहे व त्यामध्ये वादींचा हक्क व हिस्सा आहे असे म्हणता येणार नाही.

११. वादींनी प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली नाही. अशा परिस्थितीत वादींच्या मागणीप्रमाणे मनाई आदेश दिल्यास प्रतिवादीचेच अपरिमित नुकसान होईल असे दिसून येते. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींचे बाजूने नाही. सबब वर नमुद चर्चेच्या अनुषंगाने मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ –**

१२. वरीलप्रमाणे सर्व चर्चा लक्षात घेता वादीने आपला अर्ज प्रतिवादी विरुध्द प्रथमदर्शनी शाबीत केला नाही. सबब, मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज निशाणी ५ नामंजुर करण्यात येत आहे.

०२. खर्चाबाबतचा आदेश अंतिम निकालावेळी करणेत येईल.

कराड. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक– १३/१०/२०१७ ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड.